27 JUN 2026 सकाळ जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकराजास मानाचा मुजरा

कोल्हापूर, ता. २६ : राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५२ व्या जयंतीनिमित्त लक्ष्मी विलास पॅलेस येथे राजर्षी शाहू महाराज यांच्या स्मृतीस वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ व पालकमंत्री प्रकाश आबिटकर, महापौर रूपाराणी निकम, आमदार सतेज पाटील, अमल महाडिक यांच्यासह मान्यवरांनी अभिवादन केले. दरम्यान, जयंतीनिमित्त शहरात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले होते.

समाजसुधारक, लोककल्याणकारी राजा आणि सामाजिक समतेचे पुरस्कर्ते म्हणून राजर्षी शाहू महाराजांचे कार्य आजही समाजासाठी प्रेरणादायी असल्याच्या भावना यावेळी मान्यवरांनी व्यक्त केल्या. विशेष पोलिस महानिरीक्षक रंजन कुमार शर्मा, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत, महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भारूड, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन, जिल्हा पोलिस अधीक्षक निलोत्पल, शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव, शाहू जन्मस्थळ जतन विकास समितीचे इंद्रजित सावंत, वसंतराव मुळीक आदी मान्यवरांनी राजर्षी शाहू महाराजांच्या स्मृतींना वंदन केले.

### शाहू जन्मस्थळावर इतिहास संग्रहालय उभारावे

राजर्षी शाहू महाराज जन्मस्थळ, लक्ष्मी विलास पॅलेस परिसरातील उर्वरित अडीच एकर जागा जन्मस्थळाच्या नावावर हस्तांतरित करून संग्रहालय व कोल्हापूर इतिहास संग्रहालय उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, या मागणीचे निवेदन शाहू जन्मस्थळ जतन विकास समितीने पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांना आज दिले. समितीचे वसंतराव मुळीक, इंद्रजित सावंत आणि समिती सदस्य यावेळी उपस्थित होते.

### पंतप्रधानांकडून अभिवादन

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन केले. त्यांनी 'एक्स'वर पोस्ट केलेल्या भावना अशा : 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन. सामाजिक न्याय आणि समतेचे ते खंदे पुरस्कर्ते होते. वंचित, शोषित, मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले. त्यांचे महान कार्य आणि आदर्श युगानुयुगे राष्ट्राला प्रेरणा देत आणि मार्गदर्शन करत राहिल.'



कोल्हापूर : राजर्षी शाहू महाराज छत्रपती यांच्या १५२ व्या जयंतीनिमित्त लक्ष्मी विलास पॅलेस येथे प्रतिमेला वंदन करण्यात आले. या प्रसंगी पालकमंत्री प्रकाश आबिटकर, मंत्री हसन मुश्रीफ, आमदार सतेज पाटील, अमल महाडिक, महापौर रूपाराणी निकम, विशेष पोलिस महानिरीक्षक रंजनकुमार शर्मा, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, विजय देवणे, वसंतराव मुळीक आदी.

27 JUN 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकराजाला अभिवादनासाठी दसरा चौकात जनसागर

प्रतिनिधी, कोल्हापूर

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची १५२ वी जयंती शुक्रवारी कोल्हापुरात उत्साह, अभिमान आणि जल्लोषाच्या वातावरणात साजरी झाली. जयंतीनिमित्त दसरा चौकातील राजर्षी शाहू महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यासाठी दिवसभर नागरिकांची मोठी गर्दी झाली. 'राजर्षी शाहू महाराजांचा विजय असो" अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.



कोल्हापूर : दसरा चौकातील राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करताना पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह मान्यवर.

दसरा चौकात सकाळी पालकमंत्री प्रकाश आबिटकर, खासदार शाहू छत्रपती, आमदार जयंत आसगावकर, आमदार अमल महाडिक, महापौर रुपाराणी निकम, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भारुड, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅस्मिन, जिल्हा पोलीस अधीक्षक निलोत्पल,

**▪ दसरा चौकात पालकमंत्री प्रकाश आबिटकर, खासदार शाहू छत्रपतींसह लोकप्रतिनिधी व मान्यवरांची उपस्थिती**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, उपमहापौर अक्षय जरग, स्थायी समिती सभापती विशाल शिराळे, नगरसेवक मुरलीधर जाधव यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शाहू महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी विविध शासकीय व निमशासकीय विभागांचे अधिकारी, कर्मचारी, सामाजिक संस्था, शैक्षणिक संघटना, विविध पक्षांचे पदाधिकारी, शाहूप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाहूराजांच्या सामाजिक न्याय, शिक्षण, समता, सर्वसमावेशक विकासाच्या विचारांचा जागर करत अनेकांनी त्यांच्या कार्याला अभिवादन केले.

दिवसभर दसरा चौकात अभिवादनासाठी नागरिकांची गर्दी झाली होती. पारंपरिक वाद्यांचा निनाद, घोषणाबाजी आणि शाहू महाराजांच्या कार्याचा गौरव करणाऱ्या फलकांमुळे परिसराला उत्सवी स्वरूप प्राप्त झाले होते. शाहू महाराजांची लोककल्याणकारी धोरणे आणि त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला.





(सर्व छाया : पांडुरंग पाटील)

# शाहूराया तुजला मानाचा मुजरा...

## सामाजिक न्यायदिनी जयघोषात समता दिंडी उत्साहात

कोल्हापूर : प्रतिनिधी

'लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज की जय' या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला आणि सामाजिक न्यायाचा संदेश देणाऱ्या समता दिंडीला कोल्हापूरकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्मदिन 'सामाजिक न्याय दिन' म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त जिल्हा प्रशासन आणि सहायक आयुक्त, समाज कल्याण विभाग यांच्या वतीने दसरा चौक येथे समता दिंडीसह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.



समता दिंडीचा प्रारंभ पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला. यावेळी खा. शाहू छत्रपती महाराज, आ. जयंत आसगावकर, आ. अमल महाडिक, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भारुड, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जास्मिन, जिल्हा पोलीस अधीक्षक नीलोत्पल, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत, जातपडताळणी समितीच्या अध्यक्षा सुषमा सातपुते, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे अधिकारी अमित घवले, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण समितीच्या प्रशासन अधिकारी जयश्री जाधव, समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त सचिन साळे उपस्थित होते.

दरवर्षी २६ जून हा दिवस राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्मदिन 'सामाजिक न्याय दिन' म्हणून साजरा केला जातो.



आपल्या कारकिर्दीत शाहू महाराजांनी सामाजिक न्यायाची तत्त्वे प्रत्यक्षात आणत मागासवर्गीय, दिव्यांग, वृद्ध, निराधार आणि समाजातील वंचित घटकांच्या कल्याणासाठी अनेक दूरदृष्टीचे निर्णय घेतले. त्यांच्या कार्याचा आदर्श समाजासमोर राहावा आणि कोल्हापूर ही त्यांची जन्मभूमी व कर्मभूमी असल्याने हा दिवस विशेष उत्साहात साजरा करण्यात आला. समता दिंडीने व्हीनस कॉर्नर, माईसाहेब पुतळा, बिंदू चौक येथे महात्मा ज्योतिराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक, महानगरपालिका परिसरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, गंगाराम कांबळे स्मारक येथे अभिवादन करून सीपीआरमार्गे दसरा चौक मैदानात दिंडीची सांगता झाली.

शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी, सामाजिक न्याय विभागाचे अधिकारी व कर्मचारी, शासकीय वसतिगृहे, निवासी शाळा, इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या आश्रमशाळांचे प्रतिनिधी सहभागी झाले. पारंपरिक वेशभूषा, ढोल-ताशा, लेझीम पथके, हलगी वादन तसेच राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनकार्यावर आधारित चित्ररथ यामुळे दिंडी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली. महामानवांच्या साहित्याने सजलेली ग्रंथपालखीही विशेष लक्षवेधी ठरली. समता दिंडीला उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याबद्दल समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त सचिन साळे यांनी सहभागींचे आभार मानले.

## चिमुकल्याचा समतेचा संदेश

कोल्हापूर : राजर्षी शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त शाहूपुरी येथील चिमुकला श्लोक सिद्धेश मोळे याने राजर्षी शाहू महाराजांची वेशभूषा साकारत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. डोक्यावर राजेशाही फेटा, अंगावर पारंपरिक पोशाख आणि चेहऱ्यावर आत्मविश्वास झळकवत श्लोकने शाहू महाराजांच्या समता, बंधुता, सामाजिक न्याय आणि शिक्षणप्रेमाचा संदेश निरागस सादरीकरणातून प्रभावीपणे मांडला.

राजर्षी शाहू महाराजांचे विचार केवळ इतिहासापुरते मर्यादित नसून ते आजच्या पिढीपर्यंत पोहोचत असल्याचे या उपक्रमातून अधोरेखित झाले. अशा वेशभूषा स्पर्धांमधून लहान मुलांमध्ये इतिहासाबद्दलची ओढ, महापुरुषांविषयीचा आदर आणि सामाजिक मूल्यांची जपणूक रुजत असल्याचे दिसून आले. राष्ट्राचे भावी आधारस्तंभ असलेली ही चिमुकली पिढी समता, बंधुता आणि पुरोगामी विचारांचा वारसा पुढे नेईल, असा विश्वास श्लोकच्या या सादरीकरणामुळे उपस्थितांनी व्यक्त केला.

## छत्रपती शाहू जन्मस्थळी मान्यवरांकडून अभिवादन

कोल्हापूर : प्रतिनिधी

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५२ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या जन्मस्थळ असलेल्या लक्ष्मी विलास पॅलेस येथे विविध मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. समाजसुधारक, लोककल्याणकारी राजा आणि सामाजिक समतेचे पुरस्कर्ते म्हणून शाहू महाराजांचे कार्य आजही समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

यावेळी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, आमदार सतेज पाटील, आमदार अमल महाडिक, महापौर रूपाराणी निकम, विशेष पोलीस महानिरीक्षक रंजन कुमार शर्मा, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत, महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भारुड, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जास्मिन, जिल्हा पोलीस अधीक्षक नीलोत्पल, शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव, शाहू जन्मस्थळ जतन विकास समितीचे इंद्रजित सावंत, वसंतराव मुळीक यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. दिवसभर विविध क्षेत्रातील मान्यवरांसह कोल्हापूरवासियांची गर्दी झाली होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

27 JUN 2026

तरूण भारत

मान्यवरांनी व्यक्त केल्या भावना : इतिहास ग्रंथालय निधीसाठी ८ दिवसांत बैठक - पालकमंत्री : अभिवादनासाठी दोघांचा १५२ किमी प्रवास

# राजर्षी शाहूंचे कार्य आजही प्रेरणादायी

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५२ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या जन्मस्थळी लक्ष्मी विलास पॅलेस येथे विविध मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. समाजसुधारक, लोककल्याणकारी राजा आणि सामाजिक समतेचे पुरस्कर्ते म्हणून शाहू महाराजांचे कार्य आजही समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. शाहू जन्मस्थळ संग्रहालयासाठी जमीन हस्तांतरण तसेच कोल्हापूर इतिहास संग्रहालयासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबतचे निवेदनही पालकमंत्र्याना देण्यात आले. याबाबत आठ दिवसांत बैठक घेण्यात येईल, असे आश्वासन पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.



कोल्हापूर : राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५२ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या जन्मस्थळी लक्ष्मी विलास पॅलेस येथे पालकमंत्री प्रकाश आबिटकर, मंत्री हसन मुश्रीफ, आमदार सतेज पाटील, आमदार अमल महाडिक, महापौर रूपाराणी निकम यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी डावीकडून दिलीप देसाई, राजु लाटकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅस्मिन, पोलीस अधीक्षक निलोत्पल, विशेष पोलीस महानिरीक्षक रंजन कुमार शर्मा, आयुक्त डॉ. राजेंद्र भारूड, विजय देवणे, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव व वसंतराव मुळीक यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. (छाया - रियाज ट्रेनर)

- पालकमंत्री आबिटकर, मंत्री मुश्रीफ यांच्यासह मान्यवरांकडून शाहू जन्मस्थळी अभिवादन
- राजकीय, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील अनेकांची उपस्थिती

| प्रतिनिधी, कोल्हापूर

शाहू जन्मस्थळी पालकमंत्री प्रकाश आबिटकर, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, आमदार सतेज पाटील, आमदार अमल महाडिक, महापौर रूपाराणी निकम, विशेष पोलीस महानिरीक्षक रंजन कुमार शर्मा, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत, महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भारूड, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅस्मिन, जिल्हा पोलीस अधीक्षक निलोत्पल, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव, शाहू जन्मस्थळ जतन विकास समितीचे इंद्रजीत सावंत, वसंतराव मुळीक यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. राजर्षी शाहू महाराजांनी समाजातील वंचित, शोषित आणि दुर्बल घटकांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी केलेले कार्य, सर्वांसाठी शिक्षणाची दारे खुली करण्याचा दूरदर्शी निर्णय, सामाजिक न्यायासाठी आरक्षणाची मुहूर्तमेढ रोवणे तसेच जातीभेद निर्मूलनासाठी घेतलेले धाडसी निर्णय यांचे यावेळी स्मरण करण्यात आले. त्यांच्या विचारांवर आणि आदर्शांवर चालण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला.

कार्यक्रमास विविध विभागांचे शासकीय अधिकारी, कर्मचारी, नागरिक, विद्यार्थी, शिक्षक तसेच शाहूप्रेमी उपस्थित होते. कार्यक्रमानंतर शाहू जन्मस्थळ जतन विकास समितीच्यावतीने पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांना शाहू जन्मस्थळ संग्रहालयासाठी जमीन हस्तांतरण तसेच कोल्हापूर इतिहास संग्रहालयासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबतचे निवेदन देण्यात आले. दरम्यान या अभिवादन प्रसंगी ज्येष्ठ इतिहास संशोधक दिवंगत जयसिंगराव पवार सराची उणीव भासली.

### जिथे बंटी तिथे अमल, रंगतदार राजकीय टोले बाजी

शाहू जन्मस्थळी अभिवादनासाठी मान्यवर एकत्र आले असता. मंत्री महोदयांनी पुष्पहार अर्पण केले. त्यावेळी अमल महाडिक मागे राहिलेले बघून आमदार सतेज पाटील यांनी अमल पुढे या, असे म्हणताच. मंत्री मुश्रीफ यांनी लगेच हे आपलं बरं आहे. गोकुळमध्ये भांडायचं आणि इथं बोलवायचं, असे म्हणताच त्याला प्रतिउत्तर म्हणून सतेज पाटील यांनी शेवटी ते बावड्यात आलेत, असे म्हणत उत्तर दिले. अभिवादनानंतर बाहेर पडताना आबिटकर पुढे गेलेले बघुन मुश्रीफांना सतेज पाटील म्हणाले, थांबा जरा आबिटकरांशी गोकुळची चर्चा करतो, म्हणत पुढे आले. तर जन्मस्थळ जतन विकास समितीने निवेदन दिले. यावेळी वसंतराव मुळीक यांनी आमदार अमल महाडिक यांचे नाव घ्यायचे राहिल्याबद्दल दिलगिरी व्यक्त करताच मुश्रीफांनी 'जिथे बंटी तिथे अमल' अशी कोपरखळी मारली.

### अनोखे अभिवादन

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५२ व्या जयंतीनिमित्त सायकलपटू विनायक पाटील, हिम्मतराव मलमे व ॲड. महेश चौगले हे पलुसहुन १५२ किमी सायकलवरून येत जन्मस्थळ असलेल्या लक्ष्मी विलास पॅलेस येथे अभिवादन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत
27 JUN 2026

महापालिकेतर्फे जन्मस्थळावर प्रतिमेस पुष्पहार अर्पण : विविध संस्था, संघटनांच्या वतीने सामाजिक उपक्रमांनी शाहू जयंती साजरी

# राजर्षी शाहू राजांच्या जयजयकाराने शहर दुमदुमले

**शहर आणि परिसरात शुक्रवारी राजर्षी शाहू महाराज यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. यानिमित्त रक्तदान शिबिर, पोवाडे, सांस्कृतिक आणि प्रबोधनपर कार्यक्रमांतून शाहू विचारांचा जागर करण्यात आला. दिवसभर दसरा चौकातील राजर्षी शाहू महाराजांच्या पुतळ्यासमोर अभिवादनासाठी गर्दी झाली होती. महापालिकेच्यावतीने महापालिकेत महापौर रूपाराणी निकम यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच नर्सरी येथील राजर्षी शाहू समाधीस्थळीही महापालिकेच्यावतीने अभिवादन करण्यात आले.**



कोल्हापूर : महापालिकेत महापौर रूपाराणी निकम यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आयुक्त डॉ. राजेंद्र भारूड, उपमहापौर अक्षय जरग, सभागृह नेते मुरलीधर जाधव, राजेश लाटकर, आदिल फरास, सभापती विशाल शिराळे, इंद्रजित बोंद्रे आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : जगद्गुरु पंचाचार्य होमिओपॅथी महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराजांना अभिवादन करण्यात आले

| प्रतिनिधी, कोल्हापूर

**मनपाकडून लक्ष्मी विलास पॅलेस येथे अभिवादन**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त महापालिकेच्यावतीने लक्ष्मी विलास पॅलेस (कसबा बावडा) येथील जन्मस्थळातील राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेस, दसरा चौक येथील राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास, सिद्धार्थनगर येथील नर्सरी बागेतील शाहू समाधी स्थळी व कोल्हापूर महापालिकेच्या राजर्षी छत्रपती शाहू सभागृहातील राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या अर्धपुतळ्यास महापौर रूपाराणी निकम, आयुक्त डॉ. राजेंद्र भारूड यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी पालकमंत्री प्रकाश आबिटकर, मंत्री हसन मुश्रीफ, खासदार शाहू छत्रपती, आमदार सतेज पाटील, आमदार जयंत आसगावकर, अमल महाडीक, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅस्मिन, जिल्हा पोलीस अधीक्षक निलोत्पल, उप-महापौर अक्षय जरग, स्थायी समिती सभापती शिराळे, महिला बालकल्याण समिती सभापती कौसर बागवान, उपसभापती दिपा ठाणेकर, सभागृहनेता मुरलीधर जाधव, विरोधी पक्षनेता राजेश लाटकर, अतिरिक्त आयुक्त रविकांत आडसूळ, उपायुक्त किरणकुमार धनवाडे, गटनेते इंद्रजित बोंद्रे, आदील फरास, सहायक आयुक्त स्वाती दुधाणे, विजय पाटील, राम काटकर, शहर अभियंता रमेश मस्कर, जल अभियंता हर्षजीत घाटगे, मुख्य लेखापरिक्षक कलावती मिसाळ, रवका अधिकारी प्रशांत पंडत, उप-शहर अभियंता सुरेश पाटील, नगरसेवक प्रविण केसरकर, विजयसिंह खाडे-पाटील, सुभाष बुचडे, सचिन चौगुले, विनायक कारंडे, अश्किन आजरेकर, नगरसेविका सौ.पुष्पा नरुटे, रुपाली पोवार, उप-शहर अभियंता सुरेश पाटील, निवास पोवार, नगरसचिव सुनिल बिद्रे, व शाहूप्रेमी उपस्थित होते.

**महापालिका कार्यशाळा विभाग**

महापालिकेच्या कार्यशाळा विभागात राजर्षी शाहू जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमात शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कार्यशाळा विभागप्रमुख संजय भोसले यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि तंत्रज्ञांनी शाहुविचारांचे अनुकरण करण्याची प्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमाला पर्यवेक्षक, कनिष्ठ अभियंता, मेकॅनिक, कर्मचारी कल्याण मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब काटकर, सचिव महेश डफळे, कर्मचारी उपस्थित होते.

## सिद्धार्थनगरात शाहूराजांना अभिवादन

**सिद्धार्थनगर येथे राजर्षी शाहू जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी शाहू समाधी स्थळ येथे येणाऱ्यांसाठी अल्पोपहाराचे आयोजन केले होते. त्यासाठी शहर अध्यक्षा स्वाती काळे, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद, समृध्दी महिला सामाजिक संस्था सिध्दार्थनगर यांचे सहकार्य लाभले.**

**पंचाचार्य होमिओपॅथिक महाविद्यालय**

जगद्गुरू पंचाचार्य होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी झाली. जगद्गुरु पंचाचार्य एज्युकेशन सोसायटीचे होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्यावतीने महाविद्यालयाच्या प्रांगणात ज्येष्ठ होमिओपॅथिक तज्ज्ञ डॉ. मोरेश्वर कुलकर्णी यांनी राजर्षी छत्रपती शाहूंच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन केले. याप्रसंगी डॉ. संतोष रानडे यांचे 'राजर्षी शाहू व आरोग्य सेवा' याविषयी व्याख्यान आयोजित केले होते.

डॉ. संतोष रानडे यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये राजर्षी शाहू महाराजांनी मिशनच्या सहकार्याने रुग्णालयासाठी मोफत जागाही उपलब्ध करून देऊन मोफत रुग्णालये स्थापन केल्यामुळे उत्कृष्ट आरोग्यसेवा मिळाली. यामध्ये प्रामुख्याने छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय, मेरी वॉनलेस रुग्णालय, भारतामधील पहिला मोफत होमिओपॅथिक दवाखाना यांचा समावेश आहे. प्राचार्य डॉ. राजकुमार पाटील, डॉ. हिम्मत पाटील, डॉ. मिलींद गायकवाड, डॉ. सुहास पाटील, डॉ. फरजाना मुकादम, डॉ. सुजाता कामिरे, डॉ. दिपाली पाटील, डॉ. सुनेत्रा शिराळे, डॉ. गीतांजली कोरे, डॉ. वर्षा पाटील, डॉ. सचिन मगदूम, डॉ. महेश पटेल, उपस्थित होते.

## राष्ट्रीय मराठा महासंघ

**कळंबा येथे जय हनुमान बांधकाम कामगार संघटनेचे अध्यक्ष, राष्ट्रीय मराठा महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष युवराज पाटील यांच्या पुढाकाराने राष्ट्रीय मराठा महासंघाच्या संपर्क कार्यालयाचा शुभारंभ राजर्षी शाहू जयंतीला करण्यात आला. यावेळी कळंबा ग्रामपंचायत सदस्य संदीप पाटील, विकास पोवार बायडेकर, उमेश भवड यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी राज बडकस, दत्तात्रय कांबळे, सागर कदम, सुनिल पडळकर आदी उपस्थित होते.**

2 7 JUN 2026

पुढारी

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजर्षी शाहू जन्मस्थळ परिसर सुविधांसाठी बैठक घेऊ

## पालकमंत्री आबिटकर; लक्ष्मी विलास पॅलेस येथे जयंतीनिमित्त अभिवादन

**कसबा बावडा : पुढारी वृत्तसेवा**

राजर्षी शाहू महाराजांच्या जन्मस्थळाच्या विकासाला प्राधान्य देण्यात येणार असून, जन्मस्थळ परिसरातील जागेचा प्रश्न, आवश्यक सुविधा व विकास आराखड्याबाबत येत्या आठवडाभरात संयुक्त बैठक घेऊ, असे आश्वासन पालकमंत्री आबिटकर यांनी दिले. लक्ष्मी विलास पॅलेस शाहू जन्मस्थळ येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५२ व्या जयंतीनिमित्त अभिवादनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, आ. सतेज पाटील, आ. अमल महाडिक, महापौर रूपाराणी निकम, विशेष पोलीस महानिरीक्षक रंजनकुमार शर्मा, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भारूड, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन, पोलीस अधीक्षक नीलोत्पल, निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव, शाहू जन्मस्थळ जतन, विकास समितीचे इंद्रजित सावंत, वसंतराव मुळीक यांच्यासह शाहूप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**कसबा बावडा : राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांचे जन्मस्थळ लक्ष्मी विलास पॅलेस येथे विविध मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी पालकमंत्री प्रकाश आबिटकर, मंत्री हसन मुश्रीफ, आ. सतेज पाटील, आ. अमल महाडिक, महापौर रूपाराणी निकम, विशेष पोलीस महानिरीक्षक रंजन कुमार शर्मा, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड आदी. (छाया : पवन मोहिते)**

### जन्मस्थळ विकास समितीतर्फे पालकमंत्र्यांना निवेदन

कार्यक्रमानंतर शाहू जन्मस्थळ जतन विकास समितीच्या वतीने पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांना शाहू जन्मस्थळ संग्रहालयासाठी जमीन हस्तांतरण तसेच कोल्हापूर इतिहास संग्रहालयासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबतचे निवेदन देण्यात आले.

2 7 JUN 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजर्षी शाहू जन्मस्थळी विविध मान्यवरांकडून अभिवादन

## पालकमंत्री आबिटकर, मंत्री मुश्रीफ यांच्याकडून अभिवादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कसबा बावडा :** येथील राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे जन्मस्थळ असलेल्या लक्ष्मी विलास पॅलेस येथे १५२व्या जयंतीनिमित्त मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून शाहू महाराजांना अभिवादन केले.

पालकमंत्री प्रकाश आबिटकर, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, आमदार सतेज पाटील, आमदार अमल महाडिक, महापौर रूपाराणी निकम, विशेष पोलिस महानिरीक्षक रंजन कुमार शर्मा, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत, महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भारूड, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन, पोलिस अधीक्षक निलोत्पल, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव, इंद्रजित सावंत, वसंतराव मुळीक उपस्थित होते.

राजर्षी शाहू महाराजांनी समाजातील वंचित, शोषित आणि दुर्बल घटकांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी केलेले कार्य, शिक्षणाची दारे खुली करण्याचा दूरदर्शी निर्णय, आरक्षणाची मुहूर्तमेढ आदी निर्णयांचे यावेळी स्मरण करण्यात आले.



कसबा बावडा येथील लक्ष्मी विलास पॅलेस येथे १५२व्या शाहू जयंतीनिमित्त पालकमंत्री प्रकाश आबिटकर, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, आमदार सतेज पाटील, आमदार अमल महाडिक, महापौर रूपाराणी निकम यांनी पुष्पहार घालून अभिवादन केले.

27 JUN 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजर्षी शाहूंच्या कार्यकर्तृत्वाचा समता दिंडीतून जागर

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २६ : समता, बंधुता, सामाजिक न्यायाचा संदेश देणाऱ्या समता दिंडीने राजर्षी शाहू महाराजांच्या कार्यकर्तृत्वाचा जागर केला. आबालवृद्धांच्या सहभागाने निघालेल्या या दिंडीत 'लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज की जय' असा जयघोष करण्यात आला. त्यामुळे शहरातील वातावरण शाहूमय बनले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा जन्मदिवस 'सामाजिक न्याय दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. त्याचाच भाग म्हणून जिल्हा प्रशासन आणि समाजकल्याण विभागातर्फे दसरा चौकातून समता दिंडी काढण्यात आली. पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून दिंडीला सुरुवात झाली. पालकमंत्री आणि शासकीय अधिकाऱ्यांनी समता दिंडीच्या पालखीला खांदा दिला. महामानवांच्या साहित्यकृती, ग्रंथ या पालखीत होते. ते विशेष लक्षवेधी ठरले.

यावेळी खासदार श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, आमदार जयंत आसगावकर, आमदार अमल महाडिक, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भारूड, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन, जिल्हा पोलिस अधीक्षक नीलोत्पल, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत, जात पडताळणी समितीच्या अध्यक्षा सुषमा सातपुते, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे अधिकारी अमित घवले, महानगरपालिका प्रशासन अधिकारी जयश्री जाधव, समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त सचिन साळे उपस्थित होते.





कोल्हापूर : सामाजिक न्याय विभागातर्फे राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त शुक्रवारी काढण्यात आलेल्या समता दिंडीत राजर्षी शाहू महाराजांची वेशभूषा करून बग्गीसह दिंडीत सहभागी झालेला कलावंत. दुसऱ्या छायाचित्रात पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या विद्यार्थिनींनी लेझीमची प्रात्यक्षिके सादर केली.

समता दिंडीत पारंपरिक वेशभूषा, ढोल-ताशा, लेझीम पथक, हलगी वादन तसेच राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनकार्यावर आधारित चित्ररथ अग्रभागी होते. शाळकरी विद्यार्थ्यांनी शाहूकालीन वेशभूषा करीत महापुरुषांच्या व्यक्तिरेखा काही प्रसंग सजीव देखाव्यातून साकारले. ते आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले.

दिंडी व्हिनस कॉर्नर, आईसाहेब महाराज पुतळामार्गे बिंदू चौक येथे आली तेव्हा महात्मा जोतिराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना अभिवादन केले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक, महापालिका, गंगाराम कांबळे स्मारक येथे अभिवादन केले. पुढे सीपीआरमार्गे दसरा चौक मैदानात दिंडीची सांगता झाली.

दसरा चौकात पोलिस बॅण्ड पथकाने राजर्षी शाहू महाराज गौरव गीत व स्फूर्ती गीतांच्या धून वाजविल्या. पाच जिल्ह्यांतून विविध क्षेत्रांतून सेवानिवृत्त झालेल्या मान्यवर व्यक्तींनी राजर्षी शाहू महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन केले. तसेच शाहू जन्मस्थळी संचलनही केले.

समता दिंडीत जिल्ह्यातील शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी, शासकीय वसतिगृहे, निवासी शाळा, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, पुरस्कारप्राप्त व्यक्ती, तृतीयपंथी नागरिक, ज्येष्ठ नागरिक, महिला, सेवानिवृत्त पोलिस अधिकारी-कर्मचारी, राजर्षी शाहू वैद्यकीय महाविद्यालय, एनसीसी छात्र, विविध तालमी, तरुण मंडळे, बचतगट आदी सहभागी झाले.

## राजर्षी शाहू महाराजांच्या द्रष्ट्या निर्णयांचे फलक

राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक न्यायाची तत्त्वे, दुर्बल घटकांसाठी राबविलेले उपक्रम, मोफत शिक्षणाचा कायदा, पाणी व्यवस्थापन असे दूरदृष्टीचे निर्णय घेतले. त्यांची ओळख देणारे फलक या दिंडीत होते.

27 JUN 2026
सकाळ
जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर





कोल्हापूर : राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टतर्फे राजर्षी शाहू पुरस्काराने ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचा मरणोत्तर सन्मान करण्यात आला. खासदार श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्या हस्ते हा पुरस्कार त्यांच्या पत्नी वसुधा पवार यांनी स्वीकारला. यावेळी शेजारी पालकमंत्री प्रकाश आबिटकर, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन, कुलगुरू डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव, डॉ. अशोक चौसाळकर, सचिन आडसूळ, राजदीप सुर्वे. दुसऱ्या छायाचित्रात कार्यक्रमास झालेली नागरिकांची गर्दी.

# डॉ. जयसिंगराव पवार यांनी सत्याला न्याय दिला

## खासदार शाहू महाराज : राजर्षी शाहू पुरस्काराने डॉ. जयसिंगराव पवार यांचा मरणोत्तर सन्मान

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २६ : ''ज्येष्ठ इतिहास संशोधक (कै.) डॉ. जयसिंगराव पवार यांनी इतिहासातील सत्याला न्याय दिला'', असे प्रतिपादन खासदार श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांनी आज येथे केले. 'खऱ्याला खरे आणि खोट्याला खोटे' म्हणण्याची त्यांची निर्भीड भूमिका इतिहास संशोधनाला नवी दिशा देणारी ठरली, असेही ते म्हणाले.**

राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टतर्फे शाहू महाराज यांच्या हस्ते डॉ. पवार यांना राजर्षी शाहू पुरस्कार मरणोत्तर देण्यात आला. त्यांच्या पत्नी वसुधा पवार यांनी तो स्वीकारला. एक लाख रुपये, शाल, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या वेळी ट्रस्टच्या ४५ वर्षांच्या वाटचालीवरील स्मरणिकेचे प्रकाशन झाले. पालकमंत्री प्रकाश आबिटकर अध्यक्षस्थानी होते. राजर्षी छत्रपती शाहू स्मारक भवन येथे हा कार्यक्रम झाला.

खासदार शाहू छत्रपती महाराज म्हणाले, ''डॉ. पवार यांच्याशी माझा १९८५ पासून स्नेह होता. त्यांनी छत्रपती संभाजी महाराजांवरील ग्रंथ संपादित केला होता. तेथून आमचा वैचारिक संवाद सुरू झाला. त्यांनी इतिहासाची मांडणी पुराव्यांच्या आधारे केली. मराठ्यांचा इतिहास म्हणजे भारताचा इतिहास असल्याचे अभ्यासपूर्ण लेखन करत त्यांनी 'कोल्हापूर स्कूल ऑफ हिस्ट्री'ला नवी ओळख मिळवून दिली. पूर्वी पुणेकर लिहायचे आणि आपण वाचत होतो. ते इतिहासाला कशी कलाटणी देतात ते डॉ. पवार यांच्या लेखनामुळे लक्षात आले. छत्रपती शिवाजी महाराज-समर्थ रामदास भेटीसारख्या वादग्रस्त विषयांवरही त्यांनी दस्तऐवजांच्या आधारे भूमिका मांडली. त्यांनी फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांचा इतिहास समाजासमोर प्रामाणिकपणे मांडण्याचे कार्य केले.''

पालकमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, ''राजर्षी शाहू पुरस्काराला १९८४ पासून मोठी परंपरा लाभली आहे. डॉ. जयसिंगराव पवार यांनी सेवावृत्ती, सामाजिक बांधिलकी व समर्पणातून इतिहास संशोधन केले. ते माणूस म्हणून मोठे होते, तसेच ते नम्रही होते. त्यांच्या निधनाचे वृत्त मुंबईतील वृत्तपत्रांत पहिल्या पानावर होते. त्यांच्यासारखे इतिहासकार भविष्यात निर्माण व्हावेत.''

सत्काराला उत्तर देताना त्यांच्या कन्या डॉ. मंजुश्री पवार म्हणाल्या, ''मी त्यांच्या संशोधकातील माणूस पाहिला. साठ वर्षांत त्यांनी उपेक्षितांचा इतिहास उजेडात आणला. विपर्यस्त इतिहासाचे त्यांनी पुनर्लेखन केले. त्यांच्या संशोधनाचा प्रवास पायघड्या घालून झालेला नव्हता. इतिहास बाल व तरुण वयात रुजविला गेला पाहिजे, ही त्यांची भूमिका होती. त्यांचे लेखन केवळ मराठा इतिहासापुरते मर्यादित नव्हते, तर तो आधुनिक महाराष्ट्र, भारत व युरोपशी निगडित आहे.''

जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी डॉ. पवार यांना ट्रस्टतर्फे पहिल्यांदाच मरणोत्तर पुरस्कार देण्यात येत असल्याचे सांगितले. डॉ. अशोक चौसाळकर यांनी डॉ. पवार अतिरेकी भाषा न वापरणारे, टोकाची भूमिका न घेणारे व अजातशत्रू इतिहासकार होते, असे स्पष्ट केले. निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव यांनी सन्मानपत्राचे वाचन केले.

कुलगुरू डॉ. आर. के. कामत, प्रभारी कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन, जिल्हा माहिती अधिकारी सचिन आडसूळ, राजदीप सुर्वे उपस्थित होते.

### वसुधा पवार गहिवरल्या

■ डॉ. पवार यांना देण्यात आलेला राजर्षी शाहू पुरस्कार स्वीकारताना वसुधा पवार यांना अश्रू अनावर झाले. पुरस्कार स्वीकारल्यानंतर त्या व्यासपीठावरील डॉ. जयसिंगराव पवार यांच्या प्रतिमेसमोर नतमस्तक झाल्या. या क्षणाने उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू तरळले.

### राजर्षी शाहू महाराज आज हवे होते

■ आबिटकर म्हणाले, ''गावकुसातील माणसे सरपंच, सभापती, आमदार, खासदार, मंत्री होत आहेत. त्याला राजर्षी शाहू महाराज यांनी केलेले कार्य कारणीभूत आहे. आज महाराज पाहिजे होते. त्यांचे कर्तृत्व विचारांचा आदर्श घेऊन पुढे जाऊया.'

### रक्कम मराठा इतिहासातील सर्वोत्तम प्रबंधासाठी

■ डॉ. पवार यांनी संतुलित व मवाळ मनाने इतिहास उलगडला. स्वतःला कर्णकर्कश संशोधक बनू दिले नाही. त्यांच्या लिखाणाचा स्वभावधर्म नेमस्त होता. पण बोटचेपा नव्हता, असे सांगत डॉ. मंजुश्री पवार यांनी पुरस्काराची एक लाख रुपयांची रक्कम शिवाजी विद्यापीठातील मराठा इतिहासातील सर्वोत्तम प्रबंधासाठी देत असल्याची घोषणा केली.

27 JUN 2026

लोकमत

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजर्षी शाहूंचा विचार जयसिंगराव पवारांनी जनतेपर्यंत नेला

## शाहू छत्रपती : मानाचा शाहू पुरस्कार मरणोत्तर प्रदान, वसुधा पवार यांनी स्वीकारला बहुमान, सभागृहात तुडूंब गर्दी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** दिवंगत ज्येष्ठ इतिहास संशोधक प्रा. डॉ. जयसिंगराव पवार यांनी मराठ्यांचा खरा इतिहास जनतेसमोर मांडला. फुले आणि आंबेडकर यांच्यामधला दुवा राजर्षी शाहू महाराज होते. शाहू विचार हा बहुजन हिताचा विचार असल्याचे सांगायचे काम आयुष्यभर केले. इतिहास सोयीने मांडणाऱ्यांनाही पवार यांनी पुराव्यानिशी सादर केलेला खरा इतिहास मान्य करावा लागला, हे त्यांचे इतिहासाला मोठे योगदान होते, असे प्रतिपादन खासदार शाहू छत्रपती यांनी शुक्रवारी केले.

येथील शाहू स्मारक भवनमध्ये राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टच्या वतीने मानाचा शाहू पुरस्कार डॉ. पवार यांना मरणोत्तर प्रदान करण्यात आला. पवार यांच्या पत्नी वसुधा यांनी हा पुरस्कार स्वीकारला. पालकमंत्री प्रकाश आबीटकर अध्यक्षस्थानी होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ जस्मिन, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत, प्रकुलगुरू ज्योती जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ. जयसिंगराव पवार संपादित राजर्षी शाहू छत्रपती स्मारक भवन स्मरणिकेचे प्रकाशन झाले.



राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टचा मानाचा शाहू पुरस्कार शुक्रवारी दिवंगत ज्येष्ठ इतिहास संशोधक प्रा. डॉ. जयसिंगराव पवार यांना मरणोत्तर प्रदान करण्यात आला. पत्नी वसुधा पवार यांनी खासदार शाहू छत्रपती यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारला. यावेळी कुलगुरु डॉ. आर. के. कामत, पालकमंत्री प्रकाश आबिटकर, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, डॉ. जस्मिन उपस्थित होते. छाया : नसीर अत्तार

शाहू छत्रपती म्हणाले, डॉ. पवार यांच्या रूपाने भारताला मराठ्यांचा इतिहास मांडणारा इतिहासकार कोल्हापूरने दिला याचा अभिमान आहे. खऱ्याला खरं, खोट्याला खोटं म्हणणारे ते इतिहासकार होते.

पालकमंत्री आबिटकर म्हणाले, डॉ. जयसिंगराव पवार यांनी राजर्षी शाहू महाराजांना नव्या पिढीपर्यंत पोहोचवले. मरावे परी किर्तीरुपी उरावे... या उक्तीप्रमाणे आजही त्यांचे कार्य आदर्शवत आहे.

डॉ. मंजुश्री पवार म्हणाल्या, बाबांनी तत्त्वाशी तडजोड न करता इतिहासाचे विशुद्ध लेखन केले. भक्त बनले नाहीत, संशोधकाची अलिप्तता सोडली नाही..

जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी प्रास्ताविकात ट्रस्टच्या कार्याची माहिती दिली. निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव यांनी मानपत्राचे वाचन केले. डॉ. अशोक चौसाळकर यांनी डॉ. पवार यांच्या इतिहास संशोधक कार्याची माहिती दिली. पंडित कंदले यांनी सूत्रसंचालन केले. राजदीप सुर्वे यांनी आभार मानले.

### पहिला मरणोत्तर पुरस्कार...

शाहू पुरस्कार १९८४ ला सुरू झाल्यापासून तो हयात असलेल्या व्यक्तींना दिला गेला. मात्र, डॉ. पवार हे ट्रस्टी होते. मी ट्रस्टी असताना पुरस्कार कसा स्वीकारू, अशी भावना असल्याने त्यांनी यासाठी सहमती दिली नाही. अखेर यंदा प्रथमच पहिला मरणोत्तर पुरस्कार डॉ. पवार यांना दिला गेला.

### पुरस्काराचे एक लाख शिवाजी विद्यापीठाला

डॉ. मंजुश्री पवार यांनी पुरस्काराची एक लाख रुपयांची रक्कम शिवाजी विद्यापीठाला देत असल्याचे जाहीर केले. या पुरस्कारातून मराठा इतिहासातील सर्वोत्कृष्ट प्रबंधाला बक्षीस दिले जावे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

### टाळ्या वाजवणारा अध्यक्षस्थानी

पालकमंत्री आबिटकर म्हणाले, यशवंतराव मोहिते यांच्या शाहू पुरस्कार प्रदान सोहळ्याला सभागृहात जागा मिळाली नाही म्हणून मी बाहेर उभे राहून टाळ्या वाजवल्या होत्या. तोच टाळ्या वाजवणारा मुलगा आज या पुरस्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी आहे हा शाहू कार्याचाच परिणाम आहे.



### अश्रू अनावर...

डॉ. पवार यांच्या नावे पुरस्कार स्वीकारताना त्यांच्या पत्नी वसुधा पवार यांना भावना अनावर होत होत्या. पुरस्कार स्वीकारल्यानंतर डॉ. पवार यांच्या व्यासपीठावरील प्रतिमेला नमस्कार करताना दुःखावेगाने त्या खाली बसल्या. समारंभातही त्यांचे डोळे सतत ओले होते.

### पुणेकर इतिहासाला कलाटणी देतात

शाहू छत्रपती म्हणाले, पुणेकरांनी लिहिलेला इतिहास आपण अनेकवर्षे वाचत आलो. पण जयसिंगराव पवार यांच्यामुळे खरा इतिहास समजला. पुणेकर इतिहासाला कशी कलाटणी देतात हे लक्षात आले. इतिहास लेखनातील पुण्याची मक्तेदारी मोडीत काढण्याचे काम डॉ. पवार यांनी केले.

27 JUN 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खऱ्या इतिहास लेखनाला शाहू पुरस्कार

## खासदार शाहू छत्रपती : इतिहास संशोधक जयसिंगराव पवार यांना मरणोत्तर राजर्षी शाहू पुरस्कार प्रदान

प्रतिनिधी, कोल्हापूर

संशोधन करून इतिहास लेखन ही स्व. डॉ. जयसिंगराव पवार यांची स्टाईल होती. त्यांनी खरा इतिहास आपल्यासमोर आणला. त्यामुळेच कोल्हापूर स्कूल ऑफ हिस्ट्रीतून तयार झालेले ते अजातशत्रू व्यक्तिमत्व ठरले. मराठा, बहुजन समाजाला त्यांनी सतत केलेले मार्गदर्शन आणि फुले, शाहू, आंबेडकर विचारांची नव्याने केलेली मांडणी समाजाला दिशादर्शक ठरली. म्हणूनच त्यांना मरणोत्तर दिलेला राजर्षी शाहू पुरस्कार हा शाहू विचारांचाच गौरव आहे, असे प्रतिपादन खासदार शाहू छत्रपती महाराज यांनी केले.

राजर्षी शाहू मेमोरिअल ट्रस्टच्यावतीने राजर्षी शाहू स्मारक येथे ज्येष्ठ इतिहास संशोधक स्व. जयसिंगराव पवार यांना मरणोत्तर राजर्षी शाहू पुरस्कार प्रदान करण्यात आला. खासदार शाहू छत्रपती यांच्या हस्ते स्व. डॉ. पवार यांच्या पत्नी वसुधाकाकी पवार यांनी तो स्वीकारला. मानचिन्ह, सन्मानपत्र आणि रोख १ लाख रूपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे. अध्यक्षस्थानी पालकमंत्री प्रकाश आबिटकर होते. व्यासपीठावर जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. आर. के. कामत,

पान ९ पाहा



कोल्हापूर : राजर्षी शाहू पुरस्कार स्व. डॉ. जयसिंगराव पवार यांना मरणोत्तर देण्यात आला. खासदार शाहू छत्रपती यांच्या हस्ते वसुधाकाकी पवार यांनी तो स्वीकारला. याप्रसंगी डॉ. अशोक चौसाळकर, शिवाजी विद्यापीठाच्या प्र कुलगुरू ज्योती जाधव, कुलगुरू डॉ. आर. के. कामत, पालकमंत्री प्रकाश आबिटकर, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, सीईओ डॉ. जॅसमिन, निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव आणि राजदीप सुर्वे. (छाया : शशिकांत मोरे)

### पुरस्काराची रक्कम सर्वोत्कृष्ट प्रबंधासाठी...

स्व. डॉ. जयसिंगराव पवार यांना मरणोत्तर मिळालेल्या राजर्षी शाहू पुरस्काराची १ लाख रूपयांची रक्कम ही शिवाजी विद्यापीठाकडे सुपुर्द करत आहोत. या रक्कमेतून इतिहास विभागात सर्वोत्कृष्ट प्रबंध लिहिणाऱ्या विद्यार्थ्यांला यातून बक्षीस द्यावे, असा निर्णय कुटुबीयांनी घेतला असल्याचे डॉ. मंजुश्री पवार यांनी यावेळी सांगितले.

27 JUN 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खऱ्या इतिहास लेखनाला शाहू पुरस्कार

पान १ वरून

प्र कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन, निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव, राजदीप सुर्वे यांची प्रमुख उपस्थिती होती.

खासदार शाहू छत्रपती म्हणाले, स्व. डॉ. जयसिंगराव पवार यांनी म. फुले आणि डॉ. आंबेडकर यांच्यातील शाहू महाराजांचे असलेले नाते, अन् विचारांचा दुवा बहुजन समाजासमोर आणला. म्हणूनच फुले, शाहू आंबेडकरांचा विचार हा शाहूंचाच विचार बहुजन समाजाच्या हिताचा आहे, हे दाखवून दिल्याने त्यांना दिलेल्या शाहू पुरस्कारातून शाहूंच्या विचारांचाच गौरव झाल्याचे त्यांनी सांगितले.

पालकमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, डॉ. जयसिंगराव पवार यांना मरणोत्तर दिलेल्या राजर्षी शाहू पुरस्काराचे महत्व अनन्यसाधारण आहे. कोल्हापूरची परंपरा, शाहूंच्या विचारांचे संस्कार यातून पुरस्काराची उंची वाढली आहे. स्व. डॉ. पवार यांनी खऱ्या इतिहासासाठी समर्पित भावनेने जगलेल्या जीवनाचा गौरव शाहू पुरस्कारातून झाला आहे. आयुष्यभर त्यांनी समर्पित मनाने राजर्षी शाहूंचा कर्तृत्ववान विचार मांडला, आपला हयातीत तो पुढे नेला. आता आपण तो पुढच्या पिढीपर्यंत निश्चितच घेऊन जाऊ.

डॉ. पवार कुंटुबियांच्यावतीने स्व. डॉ. पवार यांच्या कन्या डॉ. मंजुश्री पवार म्हणाल्या, डॉ. पवार यांचे मराठा इतिहास हे पहिले प्रेम. २०० वर्षांचा मराठ्यांचा इतिहास त्यांनी संशोधनातून उलगडला. वैचारिक विरोधालाही त्यांनी तर्कसंगत उत्तरे दिली. शाहूंचा बृहद ग्रंथ हे त्यांच्या जीवनाचे मिशन होते. इतिहास ही समाजजागृतीची चळवळ बनावी, ही त्यांची भुमिका होती. त्यांच्यासारख्या बहुजनवादी इतिहासकारालो राजर्षी शाहू पुरस्कार मिळणे, ही आमच्यासाठी ज्ञानियांची दिवाळीच ठरली असल्याचे स्पष्ट केले.

जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी स्वागत केले. ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी प्रास्ताविक केले. राजर्षी शाहू गौरव गीत सादर करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते राजर्षी शाहू स्मारक भवन स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव यांनी मानपत्राचे वाचन केले. पंडीत कंदले यांनी सुत्रसंचालन केले. ट्रस्टचे व्यवस्थापक राजदीप सुर्वे यांनी आभार मानले.




## पुरस्कार प्रदान सोहळा अन् प्रतिमेसमोर नतमस्तक...

**स्व. डॉ. जयसिंगराव पवार यांना मरणोत्तर राजर्षी शाहू पुरस्कार देण्यात आला. तो पत्नी वसुधाकाकींनी स्वीकारला. पण मनोगतावेळी त्या भावनावश झाल्या, अन् व्यासपीठावर मांडलेल्या स्व. डॉ. जयसिंगराव पवार यांच्या प्रतिमेसमोर त्या सहचारिणी म्हणून नतमस्तक झाल्या. त्यामुळे संपूर्ण सभागृह भावनाविवश झाले.**

### चोराला न पकडणाऱ्या पोलिसांचा पगार रोखणार काय ?

शाहू स्मारकच्या कला दालनामध्ये राजर्षी शाहू महाराजांच्या आदेशाचे प्रदर्शन भरवले आहे. या प्रदर्शनात राजर्षी शाहूंच्या एका आदेशाचा उल्लेख पालकमंत्री आबिटकर यांनी केला. ते चोराला न पकडणाऱ्या फौजदार, हवालदार, अंमलदार यांचा पगार रोखण्याचा आदेश राजर्षी शाहू महाराजांनी दिला होता. आजच्या काळात या आदेशाची अंमलबजावणी होईल का, असा प्रश्न केला.

### डॉ. पवार यांच्यामुळे पुण्याच्या इतिहासाला कलाटणी

खासदार शाहू छत्रपती म्हणाले, पूर्वी पुणेकर इतिहास लिहित आणि आपण तो वाचत होतो. पण डॉ. पवार यांच्यामुळे पुण्याच्या इतिहासाला कलाटणी मिळाली. खरा इतिहास खराच राहतो. ताराराणी, जिजाऊंवर त्यांनी लिखाण केले. शिवाजी महाराज रामदास स्वामी भेट झाली नाही, हे पवार यांनी पुराव्यासह सांगितले आणि त्यामुळे ते शासनाला मान्य करावे लागले.